नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २५/०८/२०२५ ( सोमवार )**

---

## आगामी येणाऱ्या सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता नागपुर ग्रामीण पोलीसांनी काढले रूट मार्च आणि राबविल्या दंगा काबु योजना

आगामी येणाऱ्या गणेशोत्सव आणि ईद–ए–मिलाद या सणोत्सवचा बंदोबस्त असल्याने नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी सणोत्सवादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता दिनांक २५/०८/२०२५ रोजी खालीलप्रमाणे रूट मार्च घेवुन दंगाकाबु योजना राबविल्या. तसेच जनतेने सणोउत्सव आनंदाने, निर्भयतेने तसेच शांततेत साजरा करण्याबाबत आव्हान केले.

**नागपुर उपविभाग :–** श्री दिपक अग्रवाल, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग यांच्या मार्गदर्शनात खालील पोलीस स्टेशनला रूटमार्च घेतले.

**१) पोलीस स्टेशन बुटीबोरी :–** श्री दिपक अग्रवाल, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग आणि पोलीस निरीक्षक श्री प्रतापराव भोसले, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बुटीबोरी यांचे उपस्थितीत बुटीबोरी पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा बोरखेडी फाटक देशमुख ट्रेंडिंग कंपनी ते गोदावरी नगर,नवीन वसाहत प्रभाग न ०२,०३ ते बुटीबोरी मार्केट रोड बुटीबोरी ते बँक ऑफ इंडिया चौक बुटीबोरी पर्यंत या मार्गाने घेण्यात आला. रूट मार्च नंतर बँक ऑफ इंडिया चौक बुटीबोरी येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

**१) पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी :–** सहा. पोलीस निरीक्षक प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी यांचे सह एमआयडीसी बुटीबोरी पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा मौजा टाकळघाट येथील विठ्ठल मंदिर पासून ते महाजन चौक

ते अमर विद्यालय, मेन रोड टाकळघाट, बस स्टॉप पर्यंत घेण्यात आला. तसेच बस स्टॉप टाकळघाट येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

**१) पोलीस स्टेशन बेला :–** सहा. पोलीस निरीक्षक श्री सी.बी. चौहान, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांचे सह बेला पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा बेला टाउन येथे घेण्यात आला. त्यानंतर दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

सदर रूट मार्च व दंगा काबू योजनेत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदारसह ,पोलीस मुख्यालय, दंगा नियत्रंण पथक आणि गृहरक्षक असे उपस्थित होते.






MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE
MAHARASHTRA POLICE

**काटोल उपविभाग :—** श्री बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांच्या उपस्थितीत खालील पोलीस स्टेशनला रूटमार्च काढण्यात आले.

**पोलीस स्टेशन काटोल :—** श्री बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग ,पोलीस निरीक्षक श्री रंजित शिरसाठ, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन यांचे सह काटोल पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा पोलीस स्टेशन ते आंबेडकर चौक, शनी चौक, शहर मस्जिद हत्तीखाना, अण्णाभाऊ साठे नगर, जामा मस्जिद पेठ बुधवार सुभाष चौक व परत पोलीस स्टेशन या मार्गाने घेण्यात आला तसेच १) सुभाष चौक पेठ बुधवार काटोल आणि २) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दंगा काबू योजनेचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन नरखेड :— पोलीस स्टेशन नरखेड अंतर्गत** श्री बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग, सहा पोलीस निरीक्षक श्री अजित कदम यांच्यासह नरखेड पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा नरखेड शहरात तसेच ,सावरगाव दुरक्षेत्र, मोवाड दुरक्षेत्र येथे घेण्यात आला. रूट मार्च नंतर दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन जलालखेडा :— पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** श्री बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग ,पोलीस स्टेशन जलालखेडा येथील आधिकारी आणि अंमलदार यांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा जलालखेडा टाउन येथे घेण्यात आला. रूट मार्च नंतर बस स्टॉप, जलालखेडा येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कोंढाळी :— पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत** श्री बापु रोहोम, उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग ,सहा पोलीस निरीक्षक श्री राजकुमार त्रिपाठी, प्रभारी अधिकारी, कोंढाळी यांच्यासह कोंढाळी पोलीसांनी रूट मार्च काढला. नमुद रूट मार्च हा कोंढाळी टाउन येथे घेण्यात आला. रूट मार्च नंतर बाजारचौक, कोंढाळी येथे दंगा काबू योजनेबाबत सराव घेण्यात आला.

सदर रूट मार्च व दंगा काबू योजनेत स्थानिक पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदारसह ,पोलीस मुख्यालय, दंगा नियत्रंण पथक आणि गृहरक्षक असे उपस्थित होते.




पंचकृष्ण डेली निड्स
दही
दुध
केक
बटर
राज


MAHARASHTRA
POLICE
KING of
WORLD


MAHARASHTRA
POLICE




## अवैधरित्या रेतीची उपसा करून साठा करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## १ कोटी ४२ लाख ,४० हजारांचा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

**पोलीस स्टेशन पारशिवणी** :— दिनांक २४/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत पलोरा गावाजवळील पलोरा पेंच नदी घाटात सुजाद सिध्दीकी हा पोकलॅड, जेसीबी, आणि टिप्पर च्या साहायाने पेंच नदीच्या पात्रातुन अवैधरित्या रेतीचा उपसा करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन पाहणी केली असता काही इसम पेंच नदीच्या पात्रातुन अवैधरित्या रेतीचा उपसा करतांना दिसुन आले. पोलीसांना पाहुन वाहनात भरलेली रेती नमुद आरोपीतांनी नदी पात्राला लागुन असलेल्या खाजगी जागेवर खाली केली. पोलीसांनी शिताफिने पोकलॅड, जेसीबी आणि दोन टिप्पर चालकांना पकडले. त्यानां नावपत्ता विचारले असता

आरोपी क्रं १) पोकलॅंड चालक नामे निकेश रामती नारायण सिंग, वय ३३ वर्षे, रा वार्ड क्रं ५ दहेगाव रंगारी, ता. सावनेर क्रं २) जेसिबी चालक नामे अमोल विष्णुजी देखमुख, वय ३० वर्षे, रा वार्ड क्रं १ चनकापुर, ता. सावनेर क्रं ३) टिप्पर क्रं एम एच ४० ए के ५१२८ चा चालक नामे मो. कमर ताजुद्दीन खॉन , वय ४२ वर्षे, रा वार्ड क्रं ४ वलणी, ता. सावनेर , ४) टिप्पर क्रं एम एच ४० ए के ५५४५ चा चालक नामे राजेंद्र श्रावण शेंडे , वय ४० वर्षे, रा. पारडी ता. पारशिवणी अशी माहीती प्राप्त झाली. त्यांना रेती बाबत विचारणा केली असता त्यांनी सदर रेती ही आरोपी क्रं ५) सुजात अहमद सिध्दिकी, वय ५६ वर्षे, रा. अनंतनगर, नागपुर, आरोपी क्रं ६) कमर अहमद सिध्दिकी ,रा. अनंतनगर, नागपुर, ७) तबरेज सिध्दीकी रा. दहेगाव ता.सावनेर यांच्या सांगण्यावरून नदीच्या पात्रातुन अवैधरित्या रेतीचा उपसा करून नदीपात्राजवळील खाजगी जागवेर वर रेती साठविल्याचे सांगितले. पोलीसांनी रेती साठवुन ठेवलेल्या ठिकाणी जावुन पाहीणी केली असता आरोपी सुजात अहमद सिध्दिकी, वय ५६ वर्षे, रा. अनंतनगर, नागपुर हा मिळुन आला त्याला रेती उत्खनन परवाना बाबत विचारणा केली असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले.

**पोलीसांनी घटनास्थळारून ट्रक मधुन १) टाटा कंपनीचा पोकलॅंड मशिन मॉडल क्रं ई एक्स २२० किंमती ५०,००,०००/— रूपये २) जेसिबी क्र एम एच ४० पी १३७५ किंमती २५,००,०००/— ३) टाटा कंपनीचा टिप्पर क्रमांक एम एच ४० ए के ५१२८ किंमती ३०,००,०००/—रूपये, ४) टाटा कंपनीचा टिप्पर क्रमांक एम एच ४० ए के ५५४५ किंमती ३०,००,०००/—रूपये ,५) १४० ब्रास रेती किंमती ७,००,०००/— रूपये आणि तीन अॅंड्रॉईड मोबाईल असा एकुण १,४२,४०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे पारशिवणी येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज.म. सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसाना प्रतिबंध अधिनियम, सह कलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




.

## कन्हान  पोलीस स्टेशन अंतर्गत गाडेघाट घाट रोडवरील राज फार्म हाउस येथे सुरू असलेल्या जुगार अड्डयावर धाड, १८ आरोपीतांवर गुन्हा नोंद एकुण ७,५८,७१०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त,कन्हान पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन कन्हान :—**दिनांक २४/०८/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय बातमीदाराने माहीती दिली आहे कि, जुनी कामठी, गाडेघाट रोडवरील राज फार्म हाउस येथे  काही इसम ५२ तासपत्त्यांवर पैसे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. कन्हान पोलीसांनी श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी आणि पोलीस निरीक्षक श्रीमती वैंजयती मांडवधरे, ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्या मार्गदर्शनात घटनास्थळी जुनी कामठी, गाडेघाट रोडवरील राज फार्म हाउस येथे जावुन छापा टाकला असता काही ईसम तासपत्त्यांवर पैशांचे हारजीतचा जुगार खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी धाड टाकुन १८ आरोपीतांना पकडले. त्या अरोपीतांची नावे १) रामचंद्र किशोर उमाटे, वय २६ वर्षे, २) दशरथ किशोर उमाटे, वय २४ वर्षे, ३) रोशन शैलेश सोनकुसरे, वय २१ वर्षे, ४) केशव मोतीराम आस्वले, वय ३६ वर्षे, ५) विकास दिलीप धकाते, वय २८ वर्षे, ६) निशांत रामराव हेडाउ, वय २५ वर्षे, ७) अनिल जयप्रकाश अरजे, वय ४८ वर्षे, ८) विजय टेकचंद सातपुते, वय २२ वर्षे, ९) अजय विजय

भिसीकर, वय २४ वर्षे, १०) रोशन सुरेश कुंभारे, वय ३५ वर्षे, ११) शशांत प्रकाश पराते, वय २३ वर्षे १२) अभिषेक मधुकर खवास, वय २३ वर्षे १३)शुभम टेकचंद सातपुते, वय २७ वर्षे सर्व रा. तांडापेठ नागपुर १४) गौरव उदाराम बोकडे, वय २१ वर्षे रा. भरतवाडा नागपुर १५)विनय धनराज सातपुते, वय २४ वर्षे रा. तांडापेठ नागपुर १६) चंदन शालीक सातपुते, वय ३० वर्षे रा. तांडापेठ नागपुर १७)सौरभ श्रिधर गुडडे, वय २६ वर्षे, रा.तांडापेठ नागपूर १८) हेमराज शालीक सातपुते, वय २६ वर्षे रा.तांडापेठ नागपुर **यांना ताब्यात घेतले.**

**पोलीसांनी घटनास्थळावरून आरोपीतांच्या अंगझडतीत आणि डावावरील रोख रक्कम ६६१०/— रूपये ,५२ पत्ते तासपत्तेचे, १८ मोबाईल तसेच सदर घटनास्थळावरील जुगार खेळणाऱ्या इसमांचे मोटर सायकल १) हिरो स्प्लेंडर क्रमांक एम.एच. ४९ बी वाय २९०१, २) ॲक्टीव्हा क्र. एम.एच. ४९ सीपी ४२९५ ३) हिरो स्प्लेंडर क्रमांक एम.एच. ४९ सी.एन ९६२२ ४) हिरो स्प्लेंडर क्रमांक एम.एच. ४९ बी ८७४७ ,५) ईव्ही ई झेड मोटर सायकल विनाक्रमांकाची ,६) हन्टर मोटर सायकल क्रमांक एम.एच. ४९ सि क्यु ७७१३ आणि ७) बजाज डिस्कव्हर क्रमांक एम.एच. ४९ व्ही ७१०४ अशी वाहने असा एकुण ७,५८,७१०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.**

**वर नमुद १८ आरोपीतांवर पोलीस स्टेशन कन्हान येथे म.जु.का. कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत रिवर स्टोन फार्म ,तेलगाव येथे अवैधरित्या हुक्का उपलब्ध करून देणाऱ्या आरोपीतांवर गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :—** दिनांक २४/०८/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील रिवर स्टोन फार्म, तेलगाव येथे विना परवाना हुक्का व तंबाकु जन्य पदार्थ व साहित्य लोकांना पिण्यासाठी उपलब्ध करून दिले जातात. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी रिवर स्टोन फार्म, तेलगाव येथे पंचासमक्ष छापा टाकला असता तिथे आरोपी क्रं १) स्वरूप किशोर मुंडे, वय ३८ वर्ष, रा. गिटटीखदान नागपुर,

(फार्म हाउस मालक), २) हर्ष विजय कंगाले, वय १८ वर्ष, रा. राहाटे कालोनी, नागपुर ३) आदित्य माणिक इंगळे, वय २६ वर्ष, रा. झिंगाबाई टाकली (हुक्का पुरवणारे ) हे मिळुन आले. पंचासमक्ष घटनास्थळाची झडती घेतली असता तिथे १) एकुण ०९ हुक्का पाट ज्यामध्ये जीवंत अंगारे असलेले प्रती हुक्का १५०० रू प्रमाणे एकुण किंमती १३,५००/— रूपये २) कोळसा अंदाजे किमती ५००/— रूपये आणि तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण किंमती १५,२०० /— रूपयांचा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त केला.

वर नमुद आरोपीतांनी हुक्का व तंबाखु जन्य पदार्थ व साहित्य लोकांना उपलब्ध करून दिल्याने नमुद आरोपी यांचे विरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर कलम ४ (क), २१(क) सिगारेट आणि ईतर तंबाखू उत्पादने (जाहीरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन यांचे विनियमन) अधिनियम २००३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.



## पेलीस स्टेशन बेला घेण्यात आली शांतता समिती बैठक

**पोलीस स्टेशन बेला** :— सणोत्सवाच्या कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस स्टेशन बेला येथे आज दिनांक २५/०८/२०२५ रोजी सहा. पोलीस निरीक्षक श्री सी.बी चव्हाण, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बेला यांनी पोलीस पाटील तसेच गणेश उत्सवमंडळाचे पदाधिकारी यांची बैठक घेऊन कायदा कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेबाबत मार्गदर्शन करून महत्त्वाच्या सुचना देण्यात आल्या.तसेच जनतेने सणोउत्सव आनंदाने, निर्भयतेने तसेच शांततेत साजरा करण्याबाबत आवाहन करण्यात आले.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने